दि. 02/05/2026

## प्रेसनोट

# अवैध व्यवसाय विरोधी मोहिम

## नांदेड परिक्षेत्रात पहिल्या दिवशी (25) गुन्हे दाखल, (48) इसमांविरुद्ध कारवाई

पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी, दिनांक 1 ते 31 मे, 2026 दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहिम राबविण्याचे निश्चित केले असून, याबाबतच्या सविस्तर सूचना, दिनांक 28 एप्रिल रोजी परिक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर मोहिमेच्या पहिल्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (27) इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांचे विरुद्ध (7) गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून 97,520/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या (17) आरोपींविरुद्ध (16) गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून 26,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सोबतच, शस्त्र अधिनियम व कोटपा अधिनियमाप्रमाणे प्रत्येकी एक अशा एकूण (25) कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून 1,24,406/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**' खबर ' हेल्पलाइन ची मोठी मदत :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले होते. सदर हेल्पलाइनवर नागरिकांनी विश्वास दर्शविला असून, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सदर हेल्पलाइनची मोठी मदत होत असल्याचे, पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड